Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 01 Displayed on : 03/04/2021

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जात संवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती संदर्भात मुदतवाढीची महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसंदर्भात एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, व राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना (एस.ई.बी.सी फक्त वरिष्ठ महाविद्यालय) व अन्य शिष्यवृत्तीच्या ज्या योजना आहेत अशा सर्व योजनांची मुदत दि. १५/०४/२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तरी, अद्याप पर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे फॉर्म भरलेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांनी **mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर दि. १५/०४/२०२१ पर्यंत आपले शिष्यवृत्तीचे फॉर्म भरावेत.

तरी, सर्व विद्यार्थ्यांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी व दिलेल्या मुदतीत शिष्यवृत्तीचे ऑनलाईन फॉर्म भरावेत. शिष्यवृत्तीच्या फॉर्मला कोणती कागदपत्रे जोडावयाची आहेत याबाबतची स्वतंत्र नोटीस महाविद्यालयाच्या नोटीसबोर्डवर किंवा **tccollege.org** या वेबसाईटवर पहावी. जे विद्यार्थी या मुदतीत शिष्यवृत्तीचे फॉर्म भरणार नाहीत व ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश फी सवलतीत घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना उर्वरित फी भरावी लागेल याची संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच २०१८–१९, २०१९–२० मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे फॉर्म भरलेले आहेत परंतु बॅक खाते आधारकार्डशी संलग्न नसल्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप बॅकेत जमा झालेली नसेल तर अशा विद्यार्थ्यांनी आपले बॅक खाते आधारकार्डशी बॅकेत जाऊन त्वरित संलग्न करुन घ्यावे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील विद्यार्थ्यांनी सुध्दा आपले बॅक खाते त्वरित आधारकार्डशी संलग्न करुन घ्यावे. अन्यथा शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणार नाही याची संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 18-19\Notice\Scholarship Notice New 2018-19 New.docx